संक्षिप्त

सोलापुरात १२ बांगलादेशी घुसखोरांना पाच दिवसांची पोलिस कोठडी

सोलापूर : येथील अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे श्री जगदंबा महिला रेडीमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औद्योगिक संस्था कार्यरत आहे. येथून १२ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. या आरोपींना गुरुवारी (दि. ६) सोलापूर जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ११ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ही संस्था अंध व अंपगांसाठी कार्यरत असणारी संस्था आहे. याबाबत पोलिस आयुक्त एम. राजकुमार म्हणाले, काही जणांकडे आधार कार्ड आहेत. मात्र, हे आधार कार्ड कुठे बनवले, कसे बनवले, कोणती कागदपत्रे दिली याची चौकशी सुरू आहे.

शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी तेजी

मुंबई : जागतिक सकारात्मक संकेतांदरम्यान भारतीय शेअर बाजार सलग दुसऱ्या दिवशी तेजीत बंद झाला. सेन्सेक्स ६०९ अंकांनी वाढून ७४,३४० वर बंद झाला. निफ्टी ५० निर्देशांक २०७ अंकांच्या वाढीसह २२,५४४ वर स्थिरावला. गुरुवारी सर्व क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले. एफएमसीजी, मेटल, ऑईल अँड गॅस, फार्मा निर्देशांक १ ते २ टक्के वाढले. बीएसई मिडकॅप ०.६ टक्का आणि स्मॉलकॅप १.६ टक्के वाढला.

कच्च्या तेलाच्या दरात घसरण : तसेच, कच्च्या तेलाचे दर सहा महिन्यांच्या नीचांकी पातळीवर गेले आहेत. या पार्श्वभूमीवर तेल विपणन कंपन्यांच्या शेअर्सनी आज सलग चौथ्या सत्रात वाढ नोंदवली. ब्रेंट क्रूड तेलाचा दर प्रति बॅरल ७० डॉलरच्या खाली घसरला आहे.

बिबट्याचा हल्ला; ७ वर्षांचा मुलगा ठार

जळगाव : यावल तालुक्यातील किनगावजवळील साकळी जंगल परिसरातील शेतात आईचा हात धरून जात असलेला ७ वर्षांचा मुलगा बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाला. आईच्या हातातून मुलाला बिबट्याने चक्क फरपटत ओढून नेले. किनगाव साकळी परिसरात शेतकरी केतन सुरेश चौधरी यांचे शेत आहे. त्यांच्या शेताच्या आजुबाजूला जंगल आहे. गुरुवारी (दि. ६) दुपारी २ वाजेच्या सुमारास केशा प्रेमा बारेला (७) हा आदिवासी मुलगा आपल्या आईसमवेत चौधरी यांच्या शेतात चालला होता. लगतच्या जंगलात लपलेल्या बिबट्याने झेप घेत आईच्या हातातून केशाला फरपटत ओढत नेले. बिबट्याचा हल्ला होताच केशाच्या आईने केलेल्या आरडाओरडीने आजूबाजूचे शेतकरी धावले. शेतकरी धावत येताना पाहून बिबट्याने केशाला सोडून देत पळ काढला.

दहशतवादी तहव्वुर राणाची सुप्रीम कोर्टात कोल्हेकुई

वॉशिंग्टन : पुढारी वृत्तसेवा

मुंबईवरील २६/११ दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वुर राणा यांनी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात त्याच्या प्रत्यार्पणाला तत्काळ

स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. तहव्वुर राणा लॉस एंजेलिसमधील तुरुंगात आहे. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात १६६ जणांचा मृत्यू झाला होता. भारताने त्याच्या प्रत्यार्पणासाठी हालचाली गतिमान केल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या प्रत्यार्पणास मंजुरी दिली आहे. यानंतर भारतीय तपास यंत्रणांनी औपचारिकता पूर्ण करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राणाने विनंती याचिका दाखल केली आहे. मी पाकिस्तानी वंशाचा मुस्लिम आहे. त्यामुळे भारतात माझा छळ होण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे प्रत्यार्पणाच्या आदेशास स्थगिती द्यावी, अशी मागणी त्याने केली आहे.

संगमेश्वरमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत माहिती; कर्नाटकातील शहाजी महाराजांच्या समाधीची होणार डागडुजी

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

संगमेश्वर येथे ज्या सरदेसाई यांच्या वाड्याजवळ छत्रपती संभाजी महाराजांना पकडण्यात आले, त्या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांचे यथोचित स्मारक उभारण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली. सोबतच, कर्नाटकातील होदिगेरी येथील शहाजी महाराजांच्या समाधी परिसराची डागडुजी करून त्या ठिकाणाचा विकास करण्यासाठी कर्नाटक सरकारला विनंती करण्यात येणार आहे. त्यांना ते शक्य नसल्यास महाराष्ट्र शासन स्वतः सुशोभीकरण करेल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

संभाजी महाराज यांचे कसबा संगमेश्वर येथील सद्यस्थितीतील स्मारक.

विधान परिषदेत भाजप आमदार निरंजन डावखरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्षे झाल्याच्या पार्श्वभूमीवर, 'एमटीडीसी'ने राज्यातील पाच ठिकाणी महाराजांच्या जीवनावर विविध पैलूंवर डिजिटल थीम पार्क संग्रहालय उभारण्यात सादर केलेल्या प्रस्तावाचे काय झाले, असा प्रश्न विचारला.

या चर्चेच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी छत्रपती संभाजी महाराजांना जेथे शेवटची अटक झाली तो सरदेसाई वाडा सरकारने ताब्यात घेऊन त्यांच्या जीवनावर आधारित काही करावे, अशी मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, संगमेश्वर येथील सरदेसाई यांच्या वाड्याची जागा कमी पडत असल्यास या स्मारकासाठी नजीकची आणखी काही जमीन अधिग्रहीत करण्यात येईल.

पाचाडमध्ये जिजामातांचा वाडा उभारणार

राज्यातील पाच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाच्या विविध घटनांवर आधारित डिजिटल थीम पार्क उभारण्याचा निर्णय घेतला आहे, असे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. तसेच, रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथे जिजामातांचा वाडा ३५० वर्षांपूर्वी जसा होता तसा उभा करण्यात येणार आहे. तेथेही शिवसृष्टी उभारण्यात येणार आहे. सिंदखेड राजा येथील जिजामातांचे जन्मस्थान विकसित करण्यात येणार असून, उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधी परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार असल्याचेही मंत्री देसाई यांनी सांगितले.

महाकुंभ मेळ्यात होता दहशतवादी हल्ल्याचा कट

आयएसआयशी संबंधित बब्बर खालसाच्या दहशतवाद्यास अटक

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

आयएसआय या पाकिस्तानी गुप्तचर संस्थेशी संधान असलेल्या बब्बर खालसा इंटरनॅशनल या दहशतवादी संघटनेने महाकुंभमध्ये दहशतवादी हल्ल्याचा कट रचला होता, अशी माहिती तपास यंत्रणांनी दिली.

खालसाच्या दहशतवाद्याला अटक केली असून त्याच्या तपासातून ही माहिती पुढे आली आहे. अटक केलेला दहशतवादी लाजर मसीह याने महाकुंभमध्ये दहशतवादी हल्ल्याचा कट रचला होता, अशी माहिती उत्तर प्रदेशचे पोलिस महासंचालक प्रशांत कुमार यांनी दिली. मसीह याला उत्तरप्रदेश आणि पंजाब पोलिसांच्या संयुक्त कारवाईमध्ये अटक करण्यात आली आहे.१३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान प्रयागराज येथे आयोजित करण्यात आला होता. या काळात घातपाती कारस्थानाची योजना आखण्यात आली होती. कडक सुरक्षा व्यवस्थेमुळे मसीह याला आपली योजना अमलात आणता आली नव्हती. मसीहने प्रयागराजमध्ये महाकुंभ दरम्यान मोठ्या दहशतवादी हल्ल्याची योजना आखली होती. मात्र, धार्मिक मेळाव्यात कडक सुरक्षा तपासणीमुळे त्याला त्याची योजना अंमलात आणता आली नाही. उत्तर प्रदेश पोलिसांच्या एसटीएफ आणि पंजाब पोलिसांनी एक यशस्वी संयुक्त ऑपरेशन पार पाडले.

६ मार्च रोजी बब्बर खालसा इंटरनॅशनल आणि आयएसआय मॉड्यूलचा सक्रिय दहशतवादी लाजर मसीह पंजाबमधून अटक करण्यात आला. त्याच्याकडून बेकायदा शस्त्रे आणि स्फोटके जप्त करण्यात आली. यामध्ये ३ सक्रिय हातगोळे, २ सक्रिय डेटोनेटर, १३ काडतुसे आणि १ परदेशी बनावटीची पिस्तूलचा समावेश आहे. दहशतवादी मसीह पाकिस्तानच्या आयएसआयच्या सतत संपर्कात होता.

पोर्तुगालला पळून जाण्याच्या तयारीत होता

मसीह जर्मनी-स्थित बब्बर खालसा इंटरनॅशनल मॉड्यूलचा प्रमुख स्वर्ण सिंग ऊर्फ जीवन फौजीसाठी काम करत होता आणि तो थेट पाकिस्तान-स्थित आयएसआय ऑपरेटिव्हच्या संपर्कात होता, अशी माहिती प्रशांतकुमार यांनी दिली. हल्ल्यानंतर पोर्तुगालला पळून जाण्याचा त्याचा डाव होता. मात्र, पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्याचा कट फसला. महाकुंभच्या तयारीदरम्यान मसीह कौशांबी, लखनौ आणि कानपूर या ठिकाणी वावरत होता.

मेडिकलमध्ये चोरी करून पळणारे सांगलीचे दोघे ताब्यात

जयसिंगपूर : पुढारी वृत्तसेवा

येथील बसस्थानकाच्या पाठीमागील मेडिकलमध्ये जबरी चोरी करून पळणाऱ्या सौरभ प्रकाश परीट (वय २४, रा. दत्तनगर, विश्रामबाग सांगली) व ओमकार लाल कोलप (वय २५, रा. समाजमंदिरजवळ इनामधामणी, ता. मिरज) या दोघांना जयसिंगपूर पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्याकडून मोटरसायकल, रोख रक्कम असा एकूण ६४ हजार ८४७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. याबाबतची फिर्याद आशिष आदगोंडा पाटील यांनी दिली आहे.

येथील ऑक्सिजन मेडिकलमध्ये गुरुवारी रात्री दीडच्या सुमारास आईस्क्रीम घेण्याचा बहाणा करून दोघांनी मेडिकलमध्ये प्रवेश केला. त्यानंतर मेडिकलचे शटर बंद करून रोख रक्कम व मुद्देमाल बॅगेत घेऊन फिर्यादी आशिष व त्याचे वडील यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून चोरट्यांनी पलायन केले. तातडीने जयसिंगपूर पोलिसांशी संपर्क केला असता पोलिसांनी पाठलाग करून मुद्देमालासह चोरट्यांना ताब्यात घेतले.

भारतासह विदेशी निधींना कात्री लावणारा ट्रम्प यांचा निर्णय रद्द

वॉशिंग्टन : वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विदेशी देशांचा निधी थांबविण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविला आहे. या निर्णयामुळे ट्रम्प प्रशासनास झटका बसल्याचे मानले जाते.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर ट्रम्प यांनी दुसऱ्याच आठवड्यात भारत, बांगला देशसह अन्य देशांना देण्यात येणारा अमेरिकन निधी ९० दिवसांसाठी रोखण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे २ अब्ज डॉलर विदेशी निधीच्या देयकावर निर्बंध आले होते. आता फक्त इस्रायल आणि इजिप्तची आर्थिक मदत कायम ठेवली होती. मात्र आता या प्रकरणात ट्रंप यांना सर्वोच्च न्यायालयाने धक्का दिला आहे.

भेसळीचा विळखा : भाग २

धान्य, कडधान्य, भाजीपाल्याला 'भेसळीची कीड'

'अन्न-औषध प्रशासन'चे भेसळीला 'अर्थ'पूर्ण अभय; नागरिकांनीही सावध राहण्याची गरज

कोल्हापूर : सुनील कदम

कीड लागलेले किंवा खडामाती मिसळलेले धान्य-कडधान्य निकृष्ट दर्जाचे समजले जाते; पण आजकाल सकस दर्जाचे धान्य, कडधान्य आणि भाजीपाला मिळणेच दुरापास्त झालेले आहे. धान्य-कडधान्यात पोत्याने खडे, माती मिसळण्याचा धंदा राजरोस सुरू आहे. अन्न-औषध प्रशासनाने मनात आणले, तर नव्या कायद्यानुसार अशी भेसळ करणारे भेसळासुर आजन्म खडी फोडायला जाणे अवघड नाही; मात्र इच्छाशक्तीचा अभाव आणि वरकमाईच्या मोहापायी अगदी खुलेआम हा धंदा सुरू आहे.

धान्यामध्ये बार्शीची ज्वारी ही कारज्वारी म्हणून राज्यात आणि देशात प्रसिद्ध आहे; मात्र आजकाल ग्राहकांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन चक्क हायब्रीडचे दाणे कारज्वारी म्हणून ग्राहकांच्या माथी मारली जात आहे. तुरीची डाळ म्हणून लाख नावाच्या पशुखाद्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कडधान्याची डाळ विकली जात आहे. याशिवाय वेगवेगळ्या डाळींना आकर्षक रंग येण्यासाठी मिथीलीन नावाचा रासायनिक पदार्थ वापरण्यात येत असल्याचे दिसून येते.

अनाकलनीय भेसळ

साजूक तुपात चक्क रवा मिसळण्यात येतो, तर लोण्यामध्ये वनस्पती तूप मिसळण्याचे उद्योग सुरू आहेत. चहाच्या पावडरीमध्ये लाकडाचा भुसा किंवा वापरून टाकून दिलेली पावडर मिसळण्याचे प्रकार घडत आहेत. बेसणच्या पिठात कसले तरी पीठ मिसळलेले आढळून येते. वेगवेगळ्या कडधान्यांना आणि डाळींना कृत्रिम रंग देऊन त्या आकर्षक बनविल्या जाताना दिसतात. तयार मिरची पावडरमध्ये अनेकदा लाकडाचा भुसा व माती मिसळण्याचे प्रकार घडत आहेत. फरसाणसारख्या तळीव पदार्थांना खुसखुशीतपणा येण्यासाठी त्यामध्ये कपडे धुण्याचा सोडा वापरला जात आहे.

ताज्या भाजीसाठी मेलॅचिट ग्रीनचा वापर

आपण घेतलेली भाजी खरेच ताजी असेल याची खात्री देता येत नाही. कारण, हिरव्या मिरच्या, पालेभाज्या, फळभाज्या या नेहमी ताज्या दिसण्यासाठी 'मेलॅचिट ग्रीन' या रासायनिक पदार्थाचा वापर केला जातो. या रसायनाच्या पाण्यात पालेभाज्या व फळभाज्या बुडवून ठेवल्या की, दिवसभर हिरव्यागार दिसतात. हे केमिकल आहारात आल्यास कॅन्सर होण्याचा धोका संभवतो. ही भेसळ ओळखण्याचा सर्वात सोपा उपाय म्हणजे अशा भाजीवर पांढरा कपडा फिरविल्यास कपड्याला हिरवा रंग लागतो किंवा अशा भाज्या काही काळ पाण्यात बुडवून ठेवल्यास पाणी किंचित हिरव्या रंगाचे होते.

व्यापाऱ्यांकडून भेसळ

धान्य अथवा भाजीपाल्यांत होणारी भेसळ ही प्रामुख्याने व्यापारी वर्गाकडून होते. त्यामुळे धान्य किंवा भाजीपाला केव्हाही थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करणे ग्राहकांच्या हिताचे ठरते. आजकाल शहरांपासून ते पार खेड्यापाड्यांपर्यंत सर्वत्र 'चायनीज फास्टफूड'ची चलती आहे. या चायनीज पदार्थांमध्ये मसाला म्हणून जे जे काही वापरले जाते त्यातील बहुतांश पदार्थ हे वेगवेगळ्या स्वरूपाची रसायने आहेत.

अन्न-औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

अन्नातील भेसळ रोखण्यासाठी शासनाचा 'अन्न व औषध प्रशासन' हा स्वतंत्र विभाग आहे. सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे या खात्याच्या अधिकाऱ्यांनासुद्धा खाद्यपदार्थांमधील या भेसळीचा निश्चितच सामना करावा लागत असणार आहे. असे असताना हे खाते भेसळ रोखण्यासाठी नेमके करते तरी काय, हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

(क्रमशः)

मेंदू सुन्न करणारी भेसळ अन् बधिर प्रशासन

भेसळीमध्ये वापरण्यात येणाऱ्या डाळींना पिवळा रंग येण्यासाठी मिथीलीन नावाचे रसायन वापरण्यात येते. या रसायनाच्या खाण्यामुळे मानवी मेंदूवर वेगवेगळे दुष्परिणाम होतात. मेंदूतील चेतापेशी बधिर होतात. खरोखरीच सुन्न करून सोडणारी अशी ही भेसळ आहे. मात्र, कारवाई करण्याच्या बाबतीत अन्न-औषध प्रशासनच बधीर झाल्यासारखी अवस्था आहे. त्यामुळे या भेसळीला जबाबदार धरून नेमके कुणाला आजन्म कारावास ठोठावायला पाहिजे, ते ठरविण्याची वेळ आलेली आहे. भेसळासुरांना आजन्म कारावासाप्रमाणेच भेसळीकडे कानाडोळा करणाऱ्या प्रशासनालाही कारवाईच्या कक्षेत आणण्याची गरज आहे.

मंत्री जयकुमार गोरे यांचे जुने प्रकरण नव्याने चर्चेत

न्यायालयाने निर्दोष सोडल्याचा गोरे यांचा दावा

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर विरोधकांनी अन्य मंत्र्यांना टार्गेट करण्यास सुरुवात केली आहे. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी महिलेला विवस्त्र फोटो पाठविल्याचे प्रकरण काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मांडत सरकारवर टीकास्त्र सोडले. भाजपचा पश्चिम महाराष्ट्रातील पैलवान मंत्री शिक्षा होऊनही केवळ दहा हजार रुपये दंड भरून मोकळा झाला आणि पुन्हा त्या महिलेच्या मागे लागला असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, गोरे यांनी हे आरोप फेटाळून लावत न्यायालयाने ज्या प्रकरणात सहा वर्षांपूर्वी आपल्याला दोषमुक्त केले, ते प्रकरण मांडून विरोधक आपली बदनामी करत असल्याचे स्पष्टीकरण दिले.

वडेट्टीवार यांनी विधान भवन परिसरात माध्यमांशी बोलताना राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. भाजपच्या मंत्र्यांचे वर्तन असे असेल, तर राज्यातील महिलांचे संरक्षण कसे होणार? असा सवालही वडेट्टीवार यांनी केला. खासदार संजय राऊत यांनीही या विषयावरून मंत्री गोरे यांना लक्ष्य केले.

विरोधकांच्या या आरोपांवर मंत्री गोरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. २०१७ साली आपल्यावर एक गुन्हा दाखल झाला होता. त्यावर सुनावणी होऊन २०१९ साली निकाल लागला. न्यायालयाने मला दोषमुक्त केले आहे. जप्त केलेला मुद्देमाल, मोबाईल हे नष्ट करण्याचा आदेश न्यायालयाने त्याचवेळी दिला होता. आता विरोधकांनी सहा वर्षांपूर्वीचे हे प्रकरण पुन्हा उकरून काढले आहे, असे गोरे म्हणाले.

या आरोपाची चौकशी केली जावी, असे आव्हानही त्यांनी विरोधकांना दिले. तसेच, आरोप करणाऱ्यांना न्यायालयात खेचण्याचा इशाराही त्यांनी दिला.

दोनदा नापास होऊनही राजीव पंतप्रधान झाले

मणिशंकर अय्यर यांचे वक्तव्य; काँग्रेसचा पलटवार

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

माजी केंद्रीय मंत्री, काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या शिक्षणावर प्रश्न उपस्थित केले असून, यामुळे नव्या वादाला निमंत्रण मिळाले. इतके वाईट शैक्षणिक रेकॉर्ड असलेल्या व्यक्तीला पंतप्रधान कसे बनवले गेले, याचे आपल्याला आश्चर्य वाटते, असे ते म्हणाले. यादरम्यान, काँग्रेसने या वक्तव्याचा खरपूस समाचार घेत राजीवजींनी देशाला नवे व्हिजन दिल्याचे म्हटले आहे.

भाजप नेते अमित मालवीय यांनी बुधवारी त्यांच्या 'एक्स' हँडलवर अय्यर यांच्या विधानाचा व्हिडीओ शेअर केला. यामध्ये मणिशंकर म्हणाले होते की, मी राजीव यांच्यासोबत केंब्रिजमध्ये शिकलो होतो. तिथे फर्स्ट क्लास मिळणे सोपे आहे; पण नापास होणे खूप कठीण आहे. असे असूनही राजीव नापास झाले. नंतर ते इम्पिरियल कॉलेज लंडनमध्ये गेले आणि तिथेही नापास झाले. मी विचार केला, अशी व्यक्ती पंतप्रधान कशी बनू शकते.

अय्यर म्हणाले की, त्यांना १० वर्षांपासून सोनिया गांधींना भेटण्याची संधी मिळाली नाही. राहुल गांधींशी फक्त एकदाच योग्य संवाद झाला आणि मी प्रियांका गांधींना फक्त दोनदा भेटलो.

'पुढारी' दीपस्तंभ दिवाळी अंकाला सीताराम राणे पुरस्कार

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

मुंबई मराठी पत्रलेखक संघाचा २०२४ चा सीताराम राणे उत्कृष्ट अंक पुरस्कार पुढारी दीपस्तंभ दिवाळी अंकाला देण्यात आला. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, दादर सार्वजनिक वाचनालय आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुढारी दीपस्तंभ दिवाळी अंकाचे कार्यकारी संपादक सचिन परब यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

व्यासपीठावर कवी एकनाथ आव्हाड, कामगारनेते दिवाकर दळवी, संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे, चितळे उद्योगसमूहाचे राहुल जोगळेकर, दादर सार्वजनिक वाचनालयाचे सेक्रेटरी यतीन कामथे, मराठी विचारधारा प्रतिष्ठानचे विश्वस्त विकास होशिंग उपस्थित होते. अकादमी पुरस्कार विजेते लेखक एकनाथ आव्हाड आपल्या भाषणात म्हणाले, पुस्तके माणूस जोडण्याचे काम करतात. म्हणूनच आपण पुस्तकांना आपले मित्र म्हणतो. लेखकांची आणि पुस्तकांची ताकद मोठी असून वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाला आकार मिळतो.

मुंबई : एकनाथ आव्हाड यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना पुढारी दीपस्तंभ दिवाळी अंकाचे कार्यकारी संपादक सचिन परब.

सुलभ करासाठी अमेरिकेसोबत चर्चा : निर्मला सीतारामन

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

अमेरिकेसोबत व्यापारी कराबाबत बोलणी सुरू असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १ एप्रीलपासून भारतीय आयातींवर जशास तसा कर लादण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर सीतारामन म्हणाल्या की, भारताशी हितासाठी व्यापारी कराबाबत अमेरिकेशी बोलणी सुरू आहेत. भारत अमेरिका सोबत सुरू असलेल्या व्यापार चर्चांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. ट्रम्प यांच्या घोषणेमुळे भारतीय निर्यातदारांसाठी चिंता निर्माण झाली आहे, विशेषतः वस्त्रोद्योग, औषधनिर्मिती आणि माहिती-तंत्रज्ञान सेवा यांसारख्या क्षेत्रांमध्ये जे अमेरिकेसोबत स्थिर व्यापार संबंधांवर अवलंबून आहेत.

AUXILO
The next level beckons

ऑफीस क्र. ६३, ६वा मजला, कल्पतरू स्क्वेअर, कोंडीविटा रोड, अंधेरी(पूर्व) मुंबई ४०००५९- महाराष्ट्र

ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य लोकांना आणि विशेषत: खालील कर्जदार/ जामीनदार यांना येथे सूचना देण्यात येते की खाली वर्णन केलेली परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेली स्थावर मालमत्ता ही **ऑक्सिलो फिनसर्व प्रा.लिमिटेड ('एएफपीएल')** (सिक्युअर्ड क्रेडीटर) कडे तारण असून एएफपीएल.चे अधिकृत अधिकारी यांनी त्याचा **१५ ऑक्टोबर, २०२४** रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे, खाली नमूद कर्जदार/सह-कर्जदार यांच्याकडून **रू. ६,१०,३७,८६३.२९/-(रूपये सहा कोटी दहा लाख सदतीस हजार आठशे त्रेसष्ट आणि एकोणतीस पैसे फक्त)** ही **०६.१०.२०२२** रोजीप्रमाणे व्याजासह असलेली आणि त्यावरील करार दराप्रमाणे मुदत संपण्याच्या दिनांकापर्यंतचे व्याज आणि इतर मूल्ये आणि चार्जेससहीत वसूल करण्यासाठी त्यांची 'जे आहे जिथे आहे, 'जे आहे काय आहे' आणि 'जे काही आहे ते' तत्वावर **२५ मार्च,२०२५** रोजी ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे.

कर्जदाराचे नाव - मे. आनंदसागर चॅरिटेबल ट्रस्ट तासगाव (कर्जदार)
राहणार : प्लॉट क्र. ८१/९६, आनंदसागर, अमृतेश्वर नगर, दत्त माळ, तासगाव, जि. सांगली, महाराष्ट्र -४१६३१२

सह-कर्जदाराचे नाव - १) श्री. ज्ञानसेकरन आर. २) सौ. आदिस्दलक्ष्मी जी.
क्र. १२२/०१३, नॉर्थ स्ट्रीट, मेलकेलारपट्टी, उसीलमपट्टी, मदुराई- ६२५५३२, तामिळनाडू

खाली नमूद केलेल्या मालमत्ता 'ऑनलाईन ई-लिलाव'द्वारे वेबसाईट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून २५ मार्च, २०२५ रोजी कर्ज खाते क्र. ४००४१९००४४६७, ४००४१९०१२१०४ आणि ४००४१९०२१०८५ कडून एकूण रक्कम रू. ६,१०,३७,८६३.२९/-(रूपये सहा कोटी दहा लाख सदतीस हजार आठशे त्रेसष्ट आणि एकोणतीस पैसे फक्त) ही ०६.१०.२०२२ रोजीप्रमाणे व्याजासह असलेली आणि त्यावरील करार दराप्रमाणे मुदत संपण्याच्या दिनांकापर्यंतचे व्याज आणि इतर मूल्ये आणि चार्जेससहीत वसूल करण्यासाठी विकल्या जाणार आहेत.

परिशिष्ट १

गट क्र. ७४५ दक्षिण बाजूची जमीन मोजमाप साधारण ०५ हेक्टर ७० एआरआर गट क्र. ७४५मधील एकूण जमीन मोजमाप साधारण ११ हेक्टर ४०एएआर, महसूल गाव बोरेगाव, जिल्हा परिषद सांगलीच्या स्थानिक हद्दीत, तालुका पंचायत समिती कवठे महांकाळ, ग्रामपंचायत बोरेगाव आणि नोंदणी जिल्हा, सब रजिस्ट्रार कवठे महांकाळ, जिल्हा- सांगली-४१६३१२ च्या न्यायपरिक्षेत्रात स्थित, त्यावरील बांधकाम दोन्ही सध्याचे आणि भविष्यातील, मालमत्ता श्री. संजय आण्णासाहेब पाटील, सौ. विजयश्री संजय पाटील आणि कु. राजकुवर संजय पाटील यांच्या मालकीची.
उत्तर : गट क्र.७४५ आणि गट क्र. ७४७ चा उर्वरित भाग, दक्षिण : गट क्र. ७४३,
पूर्व : गट क्र. ७४८,७४९,७४४, पश्चिम : खारसिंग रोड आणि योगेवाडी शिव

राखीव मूल्य	रू. ६,१७,००,०००/-
बयाणा रक्कम	परिशिष्ट-१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक युनिटबाबत राखीव मूल्याच्या १०%
बोली वाढवण्याची रक्कम	रू. २५,०००/- किंवा परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्यानुसार फ्लॅट्ससाठी सिक्युअर्ड क्रेडीटर्स परवानगी देतील त्या पटीमध्ये.
टायटल कागदपत्रे आणि परिशिष्ट-१मध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची पाहणी करण्याचा दिनांक आणि वेळ	२४ मार्च २०२५ रोजी (वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ०२.००) (श्री. संदीप विजय उपाध्याय, फोन : ९७७३८९४७९२ ईमेल आयडी : Sandeep.upadhyay@auxilo.com)
केवायसी कागदपत्रे/बयाणा रकमेचा पुरावा वगैरेसहीत निविदा अर्ज प्रस्तुत करण्याचा दिनांक आणि वेळ	२४ मार्च, २०२५, सायं. ५.०० पूर्वी
ऑनलाईन प्रस्ताव खुले होण्याचा दिनांक आणि वेळ	२५ मार्च, २०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ३.००

टीप : लिलाव प्रक्रियेशी निगडीत तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी इच्छुक बिडर्स/खरेदीदार यांनी ऑक्सिलो फिनसर्व प्रा. लि. ची वेबसाईट https://www.auxilo.com/ पहावी.

हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट(एन्फोर्समेंट) नियम,२००२ च्या नियम ८(६) आणि ९(१) अंतर्गत निर्धारित वरील कर्जदार/ जामीनदार यांना १५ दिवसांची सूचना म्हणूनही पहावी.

ठिकाण : सांगली दिनांक : ०७.०३.२०२५ अधिकृत अधिकारी (ऑक्सिलो फिनसर्व प्रा. लि.)